<u>प्रतिवादीचा उलटतपास वादीतर्फे वकील श्री. एस.एन.भणगे यांचे मार्फत शपथेवर सुरु–</u>

**१३.** मी दावा गाळ्याचे डिसेंबर २०२३ पर्यंतचे भाडे न्यायालयात भरलेले आहे, आजपर्यंतचे भरलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की वादीने दावा गाळयाच्या ज्या भाड्याची मागणी माझ्याकडे केलेली आहे ते मी भरलेले नाही. (साक्षीदाराला निशाणी ५७ येथे त्याच्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील पान क्र. ६ मधील परिच्छेद क्रमांक ८ मधील पहिले वाक्य संपूर्ण वाचून दाखविले.) त्यावरुन मी सांगतो की मी नवीन दुकान गाळा हा भाडोत्रीपणाने स्वीकारला आहे. हे म्हणणे खरे आहे की कोणत्याही दुकान गाळ्याच्या मालकाचा त्याने भाडोत्रीने दिलेला दुकान गाळा त्याच्या हितासाठी कसा वापरावा हा त्याचा अधिकार आहे. हे म्हणणे खरे आहे की वादीचे स्वतःचे इलेक्ट्रीशियनचे दुकान असून तो व्यवसाय वाढविणे हा त्याचा अधिकार आहे. हे म्हणणे खरे आहे की दि.०१/०५/१९८६ ते ३१/०७/२०१६ या कालावधीमधील दावा गाळ्याचे भाडे मी वादीस नोटीस देण्यापुर्वी सदरचा दावा दाखल करण्यापुर्वी वादीस पोहोच केल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे आहे. सदर कालावधीतील वादीला दावा गाळ्याचे भाडे पोहोच केल्याबाबतचा पावत्या माझ्याकडे आहेत. त्या मी न्यायालयात हजर करणेस तयार आहे.

**१४.** हे म्हणणे खरे आहे की नवीन दुकान गाळ्याचे क्षेत्र हे १.८९ x ३.०५ चौमी इतके आहे. हे म्हणणे खरे नाही की जुन्या दुकान गाळयाचे क्षेत्र हे नवीन दुकान गाळ्याच्या क्षेत्रापेक्षा कमी होते. हे म्हणणे खरे नाही की नवीन दुकान गाळा हा मला दि.०१/०८/२०१६ ते दि.३०/०६/२०१७ या ११ महिन्यांच्या कालावधीसाठी लायसन्सी म्हणून प्रति महिना ५०००/– रुपये या तत्त्वावर देण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की नवीन दुकान गाळा हा मला कोणत्या तत्त्वावर तसेच तो मला कशासाठी व किती कालावधीसाठी दिला गेला होता हे दाखविण्यासाठी माझ्याकडे कोणताही लेखी करार नाही. (साक्षीदाराला निशाणी २४ ते ३० येथील नगर परिषद कर भरल्याबाबतच्या पावत्या दाखविण्यात आल्या.) त्या पावत्या पाहून दुकान गाळ्याचा वार्षीक कर हा रक्कम ११५५/– रुपये असल्याचे दिसून येते. हे म्हणणे खरे आहे की दुकान गाळ्याचा वाढीव वार्षीक कर हा मी वादीला दिलेला नाही. वादीने मला निशाणी ४३ व ४६ येथील नोटीसा पाठविल्या होत्या, पैकी निशाणी ४३ येथील नोटीसीला मी निशाणी ४५ येथे उत्तर दिले आहे. हे म्हणणे खरे आहे की वादीने माझ्याकडे नोटीशीद्वारे रक्कम रुपये

४०,०००/– इतक्या थकीत भाड्याची मागणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की मी थकीत भाडयाची रक्कम रुपये ४०,०००/– न्यायालयात जमा केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की निशाणी ४५ सोबत मी जो धनादेश वादीला पाठविला होता त्याचे विवरण मी निशाणी ४६ येथील नोटीसीमध्ये दिलेले होते. हे म्हणणे खरे आहे की मी निशाणी ४६ मध्ये नमूद केलेल्या विवरणातील रक्कम वजा करुन उर्वरित वादीने मागितलेली रक्कम मी न्यायालयात जमा केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी वादीला आमच्यात ठरल्याप्रमाणे नवीन दुकान गाळ्याचे भाडे दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की मी वादीला मे १९८६ ते ३१ जुलै २०१६ पर्यंतच्या कालावधीचे दुकान गाळ्याचे भाडे वादीला पोहोच केल्याबाबत कागदोपत्री पुरावा माझ्याकडे आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की वाढीव वार्षिक कर मी वादीला देणेस बंधनकारक नाही. हे म्हणणे खरे नाही की वादीला नवीन दुकान गाळ्याची त्याच्या प्रामाणिक गरजेसाठी व थकीत भाड्यासाठी गरज आहे. हे म्हणणे खरे नाही की राममारुती मंदिर रस्त्यावरील माझा बेकरी व्यवसाय हा चांगला चालू आहे. हे म्हणणे खरे नाही की मला नवीन दुकान गाळ्याची गरज नाही. हे म्हणणे खरे नाही की मला नवीन दुकान गाळ्याचा कब्जा वादीला द्यावयाचा नसल्याने मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

सही/–

(के.के.पाटील)

दिनांक– १४/०३/२०२४. 

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.